Smo-31 नि ९४

मोटार अपघात वाद अर्ज क्र. १५/२०२४

# सिंधुदुर्ग येथिल मे. मोटार अपघात वाद न्यायाधिकरणात

श्री. दिपक अनंत बागवे ---- **अर्जदार**

**विरुद्ध**

श्री. तुषार प्रकाश घोलप वगैरे ३ ----- **सामनेवाले**

**अर्जदारतर्फे CPC order 6 Rule 17 प्रमाणे निशाण १ मध्ये दुरुस्ती परवानगीचा विनंती अर्ज असा की,**

प्रस्तुतचा मोटार अपघात हा मुंबई – गोवा महामार्गावर कसाल येथे दिनांक १२/११/२०२३ रोजी झालेला आहे. अर्जदार याने मा. पोलिस प्रभारी अधिकारी, सिंधुदुर्गनगरी, पोलीस ठाणे यांचेकडे मोटार अपघात भरपाई दावा दाखल करणेकामी अपघातामधील पोलीस पेपरसह अपघातग्रस्त बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच-०९-एफएल-१२७९ च्या आर.सी.बुकची मागणी केली. मागणीप्रमाणे मा. पोलीस प्रभारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी श्री. संभाजी शिवाजी मस्के यांच्या नांवे असलेल्या बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच-०९-एफएल-१२७९ चे आर.सी.बुक सत्यप्रत मा. पोलीस प्रभारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या सहिशिक्यासह अर्जदार यांना दिले.

O
Other side to say.
Chairman. M.A.C.T. Sdurg

सबब, प्रस्तुत आर.सी.बुकाच्या आधारे अर्जदार यांनी बोलेरो पिकअप गाडी मालक संभाजी शिवाजी मस्के यांना सामनेवाला क्र. २ करणेत येवून मे. कोर्टात नुकसान भरपाई दावा दाखल करण्यात आला. त्यानंतर मे. कोर्टाची दावा नोटीस बजावणीकरीता अपघाताचे दिवशी वैध व इन्फोर्स असलेल्या सामनेवाला क्र. ३ कडे उतरविलेल्या व मा. पोलीस प्रभारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिलेल्या विमा पॉलिसी सत्यप्रतीवर असलेल्या आनंदनगर, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील सामनेवाला क्र. २ श्री. संभाजी शिवाजी मस्के यांना दावा नोटीस पाठविली असता सदरची दावा नोटीस न बजावता ~~परत~~ मे. कोर्टात परत आलेली आहे.



श्री दिपक अनंत बागवे